दैनिक **महावृत्त**

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक - अशोक हनवते. मो - 9421094991,7264079990








लातूर वर्ष ३ रे अंक १९० वा मंगळवार दि.२६ डिसेंबर २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# धम्म परिषदेच्या माध्यमातून लोक प्रबुद्धवादी बनावे भिक्खू जुन्सई तेरासावा (जपान)

## धम्म मिरवणूकित उसळला जनसागर जपान येथील पूजनीय भिक्खु जुन्सेई तेरासावा यांची प्रमुख उपस्थिती







लातूर दि. २५ :– बौद्ध धम्म हा प्रेम करुणा, दया, शांती यांचा निर्माता आहे. बौद्ध धम्म हा लोकशाहीचे संवर्धन करणारा आहे, धम्म परिषदेच्या माध्यमातून लोकप्रबुद्धवादी बनावे असे प्रतिपादन जपान येथील पू. भिक्खु जुन्सेई तेरासावा यावेळी केले.
बौद्ध धम्म संस्कार प्रशिक्षण चॅरिटेबल ट्रस्ट व समस्त लातूरकरांच्यावतीने धम्ममय वातावरणात पू. भिक्खु डॉ. उपगुप्त महाथेरो यांच्या मार्गदर्शनाखाली व पू. भिक्खु धम्मसेवक महाथेरो यांच्या अध्यक्षतेखाली ६ व्या अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषदेचे उदघाट्न आज दि.२५ डिसेंबर २०२३ रोजी जपान येथील पू. भिक्खु जुन्सेई तेरासावा यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी ते बोलत होते. तत्पूर्वी धम्म परिषदेच्या पहिल्या सत्रात सकाळी ठीक ०८:०० वा. धम्मध्वजारोहना नंतर पूजनीय भिक्खु संघाच्या नेतृत्वात हजारो उपासक / उपासिका यांच्या साक्षीने धम्म मिरवणूक पार पडली.धम्मपरिषदेच्या उदघाट्नानंतर पू. भिक्खु संघाने उपस्थितांना त्रिसरण पंचशील दिले.तद्नंतर परिषदेचे प्रमुख अतिथी क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजयजी बनसोडे, खासदार सुधाकर शृंगारे, प्रदीप रणपिसे, भारत आदमाने, भा. ई. नगराळे, जोगेंद्र कवाडे, आर. ई. सोनकांबळे, जि. के. डोंगरगावकर यांचे सत्कार समारंभ झाले.या प्रसंगी पू. भिक्खु महाविरो थेरो, पू. भिक्खु पय्याबोधी थेरो, पू. भिक्खु सुमेध नागसेन, पू. भिक्खु नागसेन बोधी, पू. भिक्खु पय्यावंस, पू. भिक्खु संघप्रिय, पू. भिक्खु रेवतबोधी, पू. भिक्खु धम्मसार, पू. भिक्खुनी श्रमाणेरी मेत्ता, पू भिक्खु बुध्दशील, डॉ. सुधाकर गुळवे, प्रा. कल्याण कांबळे, पृथ्वीराज शिरसाठ, मल्लिकार्जुन कराडखेलकर, जि.एस. साबळे, प्रा. यू. डी. गायकवाड, सतीश कांबळे, अन्तेश्वर थोटे, केशव कांबळे, बसवंतप्पा उबाळे, भीमराव चौधन्ते, शोभा सोनकांबळे, मंदाकिनी गोडबोले, शशिकला सुरवसे यांच्यासह हजारोच्या संख्येने उपासक–उपासिका उपस्थित होते व पूजनीय भिक्खु संघाची उपस्थिती होती.या प्रसंगी राज्य एस्सी., एस टि. कोरम, वकील मंडळ, महार बटालियनचे सेवानिवृत्त जवान यांचाही सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक पू. भिक्खु पय्यानंद थेरो यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. देवदत्त सावंत यांनी केले तर आभार प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे यांनी मानले.कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी उदय सोनवणे, अनिरुद्ध बनसोडे, सुनील बनसोडे, अविनाश आदमाने, बालाजी धायगुडे, सतीश मस्के, समाधान आचार्य, कमल गाडे, निर्मला थोटे, आशा चिकटे, सुजाता अजनिकर, अविनाश आदमाने, ज्योतीराम लामतुरे, विशाल वाहुळे, निलेश बनसोडे,पांडुरंग अंबुलगेकर, गौतम आदमाने, राहुल शाक्यमुनी, मिलिंद धावारे व सामूहिक महा बुद्ध वंदना अभिवादन कार्यक्रम सकाळी समितीच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

# काँग्रेसची यात्रा २.० ची तयारी जोमात



नवी दिल्ली : उत्तर प्रदेश प्रभारी पदावरून मुक्त केल्यानंतर, आता काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी पदयात्रेमध्ये दिसू शकतात. भारत जोडो यात्रेच्या दुस–या टप्प्याला जानेवारी २०२४ मध्ये सुरुवात होत आहे. पूर्वेकडून पश्चिमेकडे काढण्यात येणा–या या यात्रेत राहुल आणि प्रियंका गांधी हे दोघेही रस्त्यावर दिसू शकतात. सुत्राने दिलेल्या माहितीनुसार, मोठा प्रस्ताव असा आहे की राहुल गांधी आणि प्रियंका गांधी यांनी या यात्रेत सोबत चालावे. या संदर्भात रणनीती आखणा–या मंडळींनी यासंदर्भात विचारही केला आहे.
पहिल्या टप्प्यात सप्टेंबर २०२२ ते जानेवारी २०२३ पर्यंत, अर्थात जवळपास १५० दिवस राहुल गांधी यांनी पदयात्रा केली होती. यासंदर्भात बोलताना काँग्रेसच्या एका प्रमुख नेत्याने म्हटले आहे की, या संपूर्ण यात्रेदरम्यान या भाऊ–बहिणीने एकत्रीतपणे सहभागी होण्याच्या प्रस्तावावर चर्चा झाली आहे. मात्र अंतिम निर्णय अद्याप बाकी आहे. अनेक गोष्टींवर विचार करावा लागणार आहे. कारण लोकसभा निवडणूक तोंडावर आली आहे. राहुल गांधी तर नेते आहेतच. मात्र प्रियंका गांधी यांची महिला, तरुण वर्ग आणि ग्रामीण भागांतील लोकांमध्ये चांगली क्रेझ आहे, असे काँग्रेसचे मत आहे. महत्वाचे म्हणजे, दक्षिणेकडून उत्तरेकडे काढण्यात आलेल्या पहिल्या टप्प्यातील पदयात्रेतही, काही ठिकाणी प्रियंका गांधी राहुल गांधींसोबत दिसून आल्या होत्या.यावेळची यात्रा हायब्रिड मोडमध्ये नुकतेच काँग्रेस वर्किंग कमिटीने राहुल गांधी यांना यात्रा २.० काढावी असे म्हटले होते. मात्र, लोकसभा निवडणुका लक्षात घेत पुन्हा एकदा ४–५ महिने रस्त्यावर घालवीणे काचित योग्य ठरणार नाही, असेही पक्षाला वाटते.

# ३ गुन्हेगारी विधेयकांना राष्ट्रपतींची मंजुरी



नवी दिल्ली : संसदेच्या हिवाळी अधिवेशनात नुकत्याच मंजूर झालेल्या तीन सुधारित ३ गुन्हेगारी विधेयकांना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सोमवारी (डिसेंबर २५) मंजुरी दिली. त्यामुळे भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरी संरक्षण संहिता आणि भारतीय पुरावा विधेयकाचे रूपांतरण कायद्यात झाले आहे. गृह मंत्रालय लवकरच अधिसूचना जारी करू शकते. आता भारतीय दंड संहिताची (आयपीसी) जागा भारतीय न्याय (द्वितीय) संहिता, फौजदारी प्रक्रिया संहिताची (सीआरपीसी) जागा भारतीय नागरी संरक्षण (द्वितीय) संहिता आणि भारतीय पुरावा कायदाची जागा भारतीय पुरावा (द्वितीय) संहिता घेणार आहे. ऑगस्टमध्ये झालेल्या संसदेच्या पावसाळी अधिवेशनात गृहमंत्री अमित शहा यांनी ही विधेयके लोकसभेत मांडली होती. नंतर तिन्ही विधेयके पुनरावलोकनासाठी संसदीय स्थायी समितीकडे पाठवण्यात आली. गेल्या आठवड्यात बिलांची नवीन आवृत्ती सादर करण्यात आली. तीन नवीन विधेयके सादर करताना अमित शाह म्हणाले की, या महत्त्वाच्या विधेयकांचा विचार करण्यामागचा उद्देश गुन्हेगारी कायद्यांमध्ये सुधारणा करणे हा आहे. आयपीसीमध्ये सध्या ५११ कलमे आहेत. भारतीय न्यायिक संहिता त्याच्या जागी लागू झाल्यानंतर त्यात ३५६ कलमे शिल्लक राहतील. म्हणजे १७५ कलम बदलतील. प्रक्षोभक भाषणासाठी ५ वर्षांची शिक्षा प्रक्षोभक भाषण आणि द्वेषयुक्त भाषणांना गुन्ह्याच्या कक्षेत आणण्यात आले आहे. जर एखाद्याने असे भाषण केले तर त्याला तीन वर्षांच्या कारावासाची शिक्षा होईल. यासोबतच दंडही आकारण्यात येणार आहे. कोणत्याही धर्माच्या किंवा वर्गाविरुद्ध भाषण केल्यास ५ वर्षांच्या शिक्षेची तरतूद आहे.३ वर्षात द्यावा लागेल निर्णय सर्वात मोठा बदल म्हणजे, आता ट्रायल कोर्टाला प्रत्येक निर्णय जास्तीत जास्त ३ वर्षांच्या आत द्यावा लागणार आहे. देशात ५ कोटी खटले प्रलंबित आहेत. त्यापैकी ४.४४ कोटी खटले ट्रायल कोर्टात आहेत. तसेच जिल्हा न्यायालयातील न्यायाधीशांच्या २५,०४२ पदांपैकी ५,८५० पदे रिक्त आहेत.

# आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून काळमाथा युवा उद्योजक सुधीर मोहिते, उपसरपंच शामकरण शेळके यांच्यासह अनेकांचा भाजपात जाहीर प्रवेश









लातूर दि.२५–लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भादा सर्कल मधील काळमाथा गावचे युवा उद्योजक, प्रगशील शेतकरी सुधीर मोहिते पाटील, काळमाथा गावचे उपसरपंच शामकरण आबा शेळके यांच्यासह अनेकांनी भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड साहेब यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला.
लातूर ग्रामीण मतदार संघातील गावागावात वाडीवस्तीत वैयक्तिक लाभाबरोबरच जनसामान्यांच्या सर्वांगीण विकासाच्या विविध योजना शासनाच्या वेगवेगळ्या विभागामार्फत भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात राबवल्या जात आहेत.
गावोगाव होत असलेल्या विकास कामाला प्रेरित होऊन भादा सर्कल मधील काळमाथा येथील युवा उद्योजक, प्रगशील शेतकरी सुधीर मोहिते पाटील, उपसरपंच शामकरण आबा शेळके यांच्यासह अनेकांनी भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड साहेब यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला. यावेळी उपस्थित भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष पद्माकर चिंचोलकर, श्रीकृष्ण मोटेगावकर, रामचंद्र महाराज शेळके, काळमाथा भाजपा अध्यक्ष अप्पासाहेब मोहिते, उपाध्यक्ष अप्पासाहेब कांबळे, बूथ प्रमुख रामदास शेळके, भाजपचे ग्रामपंचायत सदस्य अक्षय भोसले आदी होते.
आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून काळमाथा येथील सुधीर मोहिते पाटील, शामकरण शेळके यांच्यासह माजी सरपंच राम शेळके, दयानंद पाटील, आदिनाथ पाटील, सुग्रीव भोसले, विलास भगाडे, काका शेळके, गोविंद घाटूळे, संजय पवार, राहुल झाडके, ज्ञानेश्वर गायकवाड, अरुण भोले, गोपाळ घाटूळे, सिकंदर माने, नामदेव गायकवाड, लिंबराज गायकवाड, जयपाल माने, राम नेटके व इतर अनेकांनी भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला.

## संपादकीय....

# चला.. कर्जे काढू या!

भारत सरकारच्या डोक्यावरील कर्ज झपाटयाने वाढत असून लवकरच त्याचा आकार देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाइतका होईल आंतरराष्ट्रीय नाणेनिधी केंद्राच्या डोक्यावरील कर्जाबाबत इशारा देत असताना आपली रिझव्र्ह बँक राज्यांवरील कर्जाचे वास्तव समोर मांडते, याकडे तरी लक्ष देणार का? सरत्या वर्षांच्या अखेरच्या सोमवारी भांडवली बाजार उसळण्याची शक्यता असताना आर्थिक इशाऱ्यांची जाणीव करून देणे शहाणपणाचे नाही; हे खरे. पण त्यास इलाज नाही. विशेषत: आंतरराष्ट्रीय नाणेनिधीसारखी संघटना जेव्हा भारताच्या वेगाने वाढत्या सार्वभौम कर्जाविषयी- म्हणजे सरकारने घेतलेल्या कर्जाविषयी- इशारा देत असेल तर त्याची दखल न घेणे व्यवसायाशी प्रतारणा करणारे ठरेल. या इशाऱ्यांची दखल घेणे आणखी एका कारणासाठी इष्ट ठरते. कारण हीच नाणेनिधी संघटना जेव्हा भारताविषयी बरे काही बोलते तेव्हा आपले राज्यकर्ते त्या कौतुकाच्या माळा गळयातून काढण्यास तयार नसतात. भारतास वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था असे ही संघटना वा जागतिक बँक यांपैकी कोणी म्हटले रे म्हटले की आपणास कोण स्फुरण चढते. मग समाजमाध्यमी ‘अर्थ’वटराव ही वक्तव्ये जमेल तितकी ‘व्हायरल’ कशी करता येईल या प्रयत्नांस लागतात. त्यांत त्यांचीही चूक नाही म्हणा. ‘वरिष्ठ सांगतील ते ऐकायचे’ असे संस्कार बालवयातच झाले की तेच आयुष्यभर सवयीचे होते. त्यामुळे वरिष्ठांस जे जे अप्रिय त्याकडे दुर्लक्ष करणे ओघाने आलेच. या अशांची संख्या वाढती असल्याने नाणेनिधीने दिलेल्या इशाऱ्याकडे लक्ष वेधणे आवश्यक ठरते.भारत सरकारच्या डोक्यावरील कर्ज झपाटयाने वाढत असून लवकरच त्याचा आकार देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाइतका होईल, असा इशारा नाणेनिधीचा वार्षिक अहवाल देतो. नाणेनिधीच्या सदस्य देशांशी झालेल्या करारानुसार ही संस्था वेळोवेळी संभाव्य आर्थिक आव्हानांची कल्पना देत असते. सदर इशारा हा त्या संदर्भातील अहवालाचा भाग आहे. हा इशारा देणारी व्यक्ती भारताविषयी असूया असलेली कोणी गौरवर्णीय नाही, हे लक्षात घेतलेले बरे. अर्थात सांप्रति सरकारवर कोणतीही आणि कितीही रास्त टीका करणारी व्यक्ती ही देशद्रोही ठरवली जात असल्याने नाणेनिधीवरील बंदीची मागणी पुढे येणारच नाही; असे नाही. तो धोका पत्करून नाणेनिधी हा इशारा देते त्यावरून त्याचे गांभीर्य लक्षात यावे. देशाच्या डोक्यावरील कर्ज सन २०२८ पर्यंत सकल राष्ट्रीय उत्पन्नाइतके होईल हे आणीबाणीकालीन भाकीत आहे, असेही नाणेनिधी लगेच स्पष्ट करते. याचा अर्थ असा की जागतिक अर्थव्यवस्थेसमोर सध्याची आव्हाने अधिक गहिरी झाली तर या परिस्थितीस सामोरे जाण्यासाठी देशोदेशांस विविध उपाय योजावे लागतात. कर्ज काढणे हा त्यातील एक. या कर्जात अचानक काही कारणांनी वाढ झाल्यास हे कर्ज १०० टक्क्यांवर जाईल, असा नाणेनिधीच्या इशाऱ्यांचा अर्थ. आंतरराष्ट्रीय पातळीवर अर्थसंकटाइतकेच, किंबहुना त्यापेक्षाही अधिक मोठे आव्हान आहे ते पर्यावरण बदलाचे. नाणेनिधीचा अहवाल हे नमूद करतो. या पर्यावरणीय बदलांमुळे सध्याच जे उत्पात होत आहेत ते अधिक मोठया प्रमाणावर होऊ लागल्यास- आणि ते तसे होतील असे दिसत असताना- निर्माण होणाऱ्या परिस्थितीस सामोरे जाण्यासाठी सरकारांस अधिक खर्च करावा लागेल. या अशा आकस्मिक खर्चाची तरतूद पुरेशी नाही. अशा तरतुदीशिवाय मोठे खर्च कारण उद्भवल्यास व्यक्तीप्रमाणे देशांसही कर्जे घेण्याखेरीज पर्याय राहात नाही. नाणेनिधीचा अहवाल याचीच जाणीव करून देतो.तो काहीसा टीकात्मक असल्याने आपण त्यासाठी या संघटनेस फटकारणे ओघाने आलेच. वास्तविक हा अहवाल भारतीय अर्थव्यवस्थेविषयी चार शब्द बरेही बोलतो. त्या जोडीने या अर्थव्यवस्थेसमोरील आव्हानांचा उल्लेख करताना हा इशारा ही संस्था देते. आपणास तितकीही टीका सहन होत नसल्याने या अहवालावर तीव्र प्रतिक्रिया दिली जाते. खरे पाहता तीनच महिन्यांपूर्वी, ऑक्टोबरात, आपल्या अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आपण देशावरील कर्ज कसे कमी करता येईल याबाबतच्या उपायांच्या शोधात असल्याचे म्हटले होते. या संदर्भात उगवत्या अर्थव्यवस्थांनी काय काय मार्ग चोखाळले याचा आपण अभ्यास करीत असल्याचेही त्या म्हणाल्या. म्हणजे देशावरील वाढत्या कर्जाच्या संकटाची जाणीव अर्थमंत्र्यांनाही आहे. पण अन्य कोणी तेच म्हटले की आपण फुरंगटणार! केंद्र सरकारनेच प्रसृत केलेल्या सांख्यिकीनुसार ३१ मार्च २०२३ या अर्थवर्षांच्या अखेरीस भारत सरकारच्या डोक्यावरील कर्ज १५५ लाख ६० हजार कोटी रुपयांहून अधिक आहे. (१५५.६ ट्रिलियन). हे सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या साधारण ५८ टक्के इतके होते. केंद्राच्या डोक्यावरील कर्ज हा एक भाग. त्याच वेळी आपली विविध राज्य सरकारेही कर्जाच्या ओझ्याखाली पिचू लागलेली आहेत ही बाबदेखील तितकीच महत्त्वाची ठरते. यात योगायोगाची बाब म्हणजे आंतरराष्ट्रीय नाणेनिधी केंद्राच्या डोक्यावरील कर्जाबाबत इशारा देत असताना आपली रिझव्र्ह बँक राज्यांवरील कर्जाचे वास्तव समोर मांडत होती. ते अधिक चिंताजनक म्हणायला हवे.देशातील एकूण ३३ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश प्रशासनांवरील कर्जे त्यांच्या उत्पन्नाच्या मानाने अधिक आहेत. त्यातही १२ राज्ये अशी आहेत की त्यांची वित्तीय व्यवस्था तातडीने लक्ष घालावे अशी नाजूक आहे. अरुणाचल प्रदेश, बिहार, गोवा, हिमाचल प्रदेश, केरळ, मणिपूर, मेघालय, मिझोराम, नागालँड, पंजाब, राजस्थान आणि पश्चिम बंगाल या राज्यांचे वित्तीय व्यवस्थापन तोळामासा असल्याचे रिझव्र्ह बँकेचा अहवाल सांगतो. यातील केरळची परिस्थिती त्यातल्या त्यात बरी. कारण त्या राज्यात पर्यटन आणि परदेशस्थ केरळींकडून येणाऱ्या निधीचा ओघ भरभक्कम आहे. पण बाकी राज्यांच्या वित्तीय व्यवस्थापनाबाबत बरे बोलावे असे काहीही नाही. खरे तर केरळप्रमाणे गोवा राज्यास या दोन्ही घटकांचे तितकेच सशक्त वरदान लाभलेले आहे. पण वित्त व्यवस्थापनाच्या नावे गोव्याची बोंब.

# आंबेडकरी धम्म क्रांतीची नवी दिशा

डॉ. बाबासाहेब आंबेडकर रांचा कार्यकर्ता नांवाची डिग्री कशी हाय रं....आंबेडकरी धम्म क्रांतीची रसद पुरविण्याची भूमिका तुमची आणि आमची प्रामाणिक असली पाहिजे.जिथे बाबासाहेबांचे पुरावे आहेत.लिखित आदेश आहेत ते मान्य करून रथ चालला पाहिजे.कोणतीही एक व्यक्ती.एक संघटना म्हणजे बाबासाहेबांचा समतेचा रथ होऊ शकत नाही.साहित्यातिल बाबासाहेब मस्तकात उतरविने हा काही एक दोन तासाचा किंवा एका दिवसांचा विषय नाही.सातत्य समर्पण टाइम मॅनेजमेंट करून हे अभ्यासावे लागेल.तरच बाबासाहेबांचा कार्यकर्ता म्हणवून घेता येईल.प्रत्येक तालुका आणि जिल्हा पातळीवर समता सैनिक दल प्रशिक्षण केंद्र (ट्रेनिंग सेंटर) उभारून आंबेडकरी धम्म क्रांतीची रसद पुरविणारी आणि सक्षम मिशनरी सैनिक कार्यकर्ता घडविणारी यंत्रणा,मशीन उभी केली पाहिजे.खूप वर्ष वाया गेली आहेत. आत्ता वेळ वाया घालवुन कसे चालेल.



विविध संस्था आपापल्या पद्धतीने त्रेब्ुेझ करीत आहे.यातून नक्कीच समाधान मिळत आहे.काहीशा प्रमाणात झीेशीे थीेझ देखिल करीत आहे.यातून रिझल्ट निघत आहे.हे अभिनंदणीय असे अभिमानास्पद कार्य आहे.याबाबत गर्व आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा नाव घेवून बाबासाहेबांचा कार्यकर्ता बनणे सहज अगदी कोणालाही शक्य आहे.परंतु डॉ बाबासाहेब खऱ्या अर्थाने मस्तकात उतरवून बाबासाहेबांचा कार्यकर्ता बनणे इतके सहज शक्य नाही.या करीता या जगविख्यात ज्ञानी महापुरुषाला अभ्यासावे लागेल.एखादी शैक्षणिक डिग्री चे शिक्षण घ्यायचे असेल आणि ही डिग्री आपल्या नावा पुढे लिहून मिरवायचे असेल तर किमान १५ वर्ष शिक्षण घ्यावे लागते. पुढे यात मास्टर करायचे असेल किंवा हिव करायचे असेल तर पुढे आणखी दोन चार वर्ष शिकावे लागते.तेव्हा कुठे डिग्री मिळते.मग आम्ही सांगतो मी ड्डइ आहे. चइइड आहे. चइ- आहे.वगैरे.अशा या डिग्री मिळविणे म्हणजे बाबासाहेबांचा फक्त एखाद मुद्दा मिळविणे इतकेच असते.संपूर्ण बाबासाहेब नावाची डिग्री मिळवायची असेल तर किती शिकावे लागेल. किती एकाग्र बनावे लागेल.हे सर्व मिळविण्यास समर्थ होऊ शकलो तर म्हणू या आम्ही बाबासाहेबांचे अनुकरण प्रिय कार्यकर्ते.लावू या मग डिग्री आपल्या नावापुढे मी बाबासाहेबांचा कार्यकर्ता....

पण आज घडीला बाबासाहेबांचा कार्यकर्ता ही डिग्री सहज मिळते आणि आपल्या नावापुढे चिटकवते.त्यामुळे बाबासाहेबांना अपेक्षित काम.बाबासाहेबांना अपेक्षित समाज.बाबासाहेबांना अपेक्षित व्यक्ती घडताना दिसत नाही.ज्या व्यक्ती आहेत त्या अत्यंत त्यागातुन तावून सुलाखुन अभ्यास करून ध्येयाने तयार झाल्या आहेत.अशांना वंदन आहे.परंतु अशा व्यक्तींची संख्या अतिशय कमी आहे.खऱ्या अर्थाने हेच लोक समाजाचे मार्गदर्शक असायला हवेत.अशा लोकांनी एकत्र येवून संघटित झाले पाहिजे. संस्था संघटना खूप आहेत.बाबासाहेबांचे कार्यकर्ते घडविन्यात आम्ही कमी पडलो आहोत का हे तपासले पाहिजे.देणारे खूप आहेत.घेणारे असायला हवेत. जे जे काही उपलब्द आहे ते फक्त आणि फक्त बाबासाहेबांचे आहे.आमचे असे काहीच नाही.त्यामुळे या सर्वांवर या देशातील प्रत्येक व्यक्तीचा अधिकार आहे.

या देशातील प्रत्येक व्यक्तीने बाबासाहेबांचा चष्मा आपल्या डोळ्यावर लावावा.बस इतके होऊ शकल्यास बाबासाहेबांचे मिशन पूर्ण होण्यास वेळ लागणार नाही.संपूर्ण महाराष्ट्रात व देशात हे मिशन उभे करणारे निःस्वार्थी कार्यकर्त्यांची फौज उभी झाली पाहिजे.त्या शोधात.

*********

**राजेंद्र वाघमारे**
**८०९७००४८०२,**
**खपोली,जिल्हा- रायगड.**

# मनुस्मृती होम' कुणी घालावा?

विदेशी आर्यांच्या धर्माचे कायदे कानून अर्थात आजच्या भाषेतील इंडियन पिनल कोड (आयपीएस) व सिव्हील कोड असणार्या मनुस्मृतीचा होम (दहन) २५ डिसेंबर १९२७ रोजी महाड येथे घातला होता.पण आजही मनुस्मृतीचे समर्थन करणारे कमी नाहीत. समर्थन करणारे लोक सुमारे ३२० पानाच्या मनुस्मृतीमधील चांगल्या श्लोकाचे उदाहरण देत असतात.पण भले माणूस हिताचे नियम असतील,मात्र मनुस्मृतीमध्ये बहुतांशी कोड हे माणसाला पशु-पक्षापेक्षाही तुच्छ समजणारे,माणसा-माणसामध्ये भेद करणारे होते व स्त्री लिंगाला अत्यंत दुय्यम व पुरूष लिंगाची भोग आहे असे मानणारे आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मनुस्मृती होम करण्याचा निर्णय घेवून सामुहिकरित्या मनुस्मृती जाळली का? याचे उत्तर शोधावे. आपल्या धर्मातील लोकावर अन्याय करणारे मनुस्मृतीमधील नियम बदलत का नाहीत? कदाचित त्याना ते आयपीएस व सिव्हील कोड आज व भविष्यातही हवे असावेत. त्यामुळे भविष्यात हिंदू समाजातील अन्य कोण्या व्यक्तींनी मनुस्मृतीचे दहन केले, तर त्याना दोषी देता येईल का? मनुस्मृतीमध्ये असे काय आहे की विदेशी आर्यांचे वंशज गंगाधर सहस्त्रबुध्दे यांच्या हस्ते मनुस्मृती होम करावी लागली हे पाहणे महत्वाचे आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या ‘शुद्र मूळचे कोण होते?’ या पुस्तकात मनुस्मृतीचे नियम दिले आहेत. त्यातील महत्वाचे काही नियम पाहू १.जग निर्माण करणार्या परमेश्वराने ब्राम्हण,क्षत्रिय,वैश्य आणि शुद्र यांना अनुक्रमे स्वतःच्या मुखापासून,बाहुपासून, मांड्यापासून व पायांपासून जगाच्या मुखसमृध्दीसाठी निर्माण केले (अध्याय-१, श्लोक-३१), २.ब्राम्हण, क्षत्रिय व वैश्य या तीन द्विज जाती होत. परंतु चवथी जात शुद्र हिला एकच जन्म आहे.(अध्याय-१०, श्लोक-४),३.शुद्राचे प्रेत गावाच्या दक्षिण वेशीतून स्मशानाकडे न्यावे,परंतु द्विजा (ब्राम्हण,क्षत्रिय व वैश्य) प्रेते अनुक्रमे पश्चिम, उत्तर व पूर्व वेशीतून स्मशानाकडे न्यावीत (अध्याय-५, श्लोक-९२),४. शुद्राला कोणी सल्लामसलत देवू नये किंवा त्याला देवाला वाहून उरलेले अन्न अथवा लोणीही कोणी देवू नये.शुद्राला कायदा कानून कोणी शिकवू नये किंवा त्याला धार्मिक विधी करण्याबद्दलची माहिती कोणी देवू नये. ही आज्ञा जो पाळणार नाही तो त्या शुद्राबरोबर असमव्रत नावाच्या नरकाच्या घोर अंधारात खिपत पडेल (अध्याय-४, श्लोक-७८-८१), ५. मनात कोणत्याही प्रकारचा किंतु न आणता ब्राम्हणाने शुद्राच्या वस्तु आपल्या ताब्यात घ्याव्यात. कारण स्वतःची चीजवस्तू शुद्राला नसते. तो गुलाम आहे व त्याची जी काही जीचवस्तू असेल तिच्यावर त्याचा हक्क नसतो. त्याच्या धन्याचा असतो (अध्याय-८,श्लोक-४१७), ६.शुद्र धनसंचय करण्याला समर्थ असला तरी त्याने संपत्ती कमावू नये.कारण शुद्राजवळ असलेली संपत्ती पाहिल्याबरोबर ब्राम्हणाच्या चित्ताला वेदना होतात (अध्याय-१०,श्लोक-१२९), ७.ज्या राज्यात शुद्रांचा प्रामुख्याने भरणा आहे आणि त्यात धर्मालंड लोकांचा बुजबुजाट झालेला आहे व ज्यात द्विज (ब्राम्हण,क्षत्रिय व वैश्य) वर्णाचा एकही माणूस नाही असले राज्य दुष्काळ आणि निरनिराळ्या रोगांच्या साथी यांच्या तडाख्यांनी समूळ नष्ट होईल.(अध्याय-८, श्लोक-२०-२२) ८. एखाद्या शुद्राने सर्वात वरिष्ठ जी जात आहे त्याच जातीतील मुलीच्या (ब्राम्हण मुलीच्या) प्रेमाची याचना केली तर त्यास देहांताची शिक्षा द्यावी (अध्याय-८, श्लोक-३६६), ९. त्रैवर्णिक (ब्राम्हण, क्षत्रिय व वैश्य) या वर्णात जातीत जन्मलेल्या स्त्रीबरोबर एखाद्या शुद्राने संभोग केला तर त्या स्त्रीला पालक असो वा नसो त्या शुद्राचे लिंग कापून टाकावे. त्या स्त्रीला पालक नसेल तर त्या शुद्राची सर्व मालमत्ता जप्त करावी व त्याला देहांताची शिक्षा करावी.(अध्याय-८, श्लोक-३७४), १०.शुद्र स्त्रीच्या स्वरूपात मोहून जावून त्रैवर्णिक जातीतील जे पुरूष तिला बायको करतात,ते आपले कुळ व भावी पिढी यांना शुद्राच्या अवस्थेला लवकर नेवून पोहचवितात (अध्याय-३, श्लोक-१२-१५), ११.उपरिनिर्दिष्ट (ब्राम्हण,क्षत्रिय,वैश्य) जातींची बिनबोभाट सेवाचाकरी करणे हे एकच काम परमेश्वराने शुद्रांना दिले. (अध्याय-१, श्लोक-८७-९१) १२.धन्याने शुद्राला स्वतःच्या नोकरीतून मोकळे केले असले तरी तो शुद्र आपल्या गुलामगिरीतून मुक्त होवू शकत नाही. कारण गुलामगिरी ही त्याच्या जन्माची सोबतीण आहे. मग त्याच्यापासून तिला कोण मुक्त करू शकेल? (अध्याय-८, श्लोक-४१२-४१४), १३.ब्राम्हणाची सेवा करणे हाच शुदांचा उत्तमोत्तम धंदा होय,असे सर्वांचे मत आहे. कारण त्या व्यतिरिक्त त्याने दुसरा धंदा केला तर त्यामुळे त्याचा काही फायदा होणार नाही.जो शुद्र आपली सेवाचाकरी करतो, त्याची कुवत,हुशारी आणि कुटुंबस्थिती याबद्दल चौकशी करून त्या मानाने ब्राम्हणांनी घरातील वस्तुतून काही वस्तू त्या शुद्रांचे संगोपन करण्यासाठी दिल्या पाहिजेत. घरात शिल्लक राहिलेले अन्न,जुने कपडे,कुजके धान्य आणि जुनी लोकडी आसने ही ब्राम्हणांनी आपल्या शुद्रास नोकरास द्यावीत. (अध्याय-१०, श्लोक-१२१-१२५). १४.ब्राम्हणाचे मंगलसूचक,क्षत्रियाचे सत्तासूचक,वैश्यांचे संपत्तीसूचक आणि शुद्राचे तिरस्कारदर्शक असे प्रत्येकाचे नाव असावे.ब्राम्हणाचा प्रगतीदर्शक, क्षत्रियाचा सुरक्षादर्शक,वैश्याचा संपत्तीदर्शक आणि शुद्राचा सेवादर्शक असा प्रत्येकाचा उत्कृष्ट गुण असावा.(अध्याय-२, श्लोक-३१-३२)

‘द पीपल्स पोस्ट’ या पाक्षिकात डॉ.आनंद राऊत यांच्या ‘संविधानाने बांधले मनुस्मृतीचे थडगे’ या प्रसिध्द झालेल्या लेखात मनुस्मृतीत महिलासंबंधी दिलेले कायदे कानून दिले आहेत ते थोडक्यात पाहू. १.लग्नात वधूचे दान केले जाते, त्यामुळे ती पतीच्या मालकीची वस्तू असते हे तिने कायम ध्यानात ठेवावे. (अध्याय-५. श्लोक-१५२), २. व्याभिचार हाच स्त्रियांचा स्वभाव आहे. (अध्याय-९.श्लोक-१९) ३. पती सदाचारशून्य असो,तो दुसर्या बाईवर प्रेम करीत असो,विद्येने तो गुणशून्य असो, तो कसाही असला तरी पत्नीने त्याची देवाप्रमाणे सतत सेवा करावी.(अध्याय-५.श्लोक-१५४), ४.पुरूषाला पाहिल्याबरोबर संभोगाविषयी अभिलाषा उत्पन्न होणे हा स्त्रीचा स्वभाव असतो. त्या चंचल असतात. त्या स्वभावतः स्नेहशून्य असतात. (अध्याय-९.श्लोक-१५), ५.सहज शृंगार चेष्टेने मोहित करून पुरूषांस दुषित करणे हा स्त्रियांचा स्वभावच आहे. यास्तव ज्ञानी पुरूष स्त्रियांविषयी कधी बेसावध राहात नाहीत.(अध्याय-२. श्लोक-१३), ६.ब्राह्मण आणि क्षत्रिय यांनी कितीही अडचण आली तरी शूद्र स्त्रीशी विवाह करू नये. (अध्याय-३.श्लोक-१४), ७.शुद्र स्त्रीशी रतिसंबंध ठेवल्याने ब्राह्मण अधोगतीला जातो. तिला मूल झाले तर त्याचे ब्राह्मण्यच नष्ट होते.(अध्याय-३.श्लोक- १७) ८.जिचा पिता कोण याचे ज्ञान नाही तसेच जिला भाऊ नाही तिच्याशी शहाण्याने विवाह करू नये. (अध्याय-३.श्लोक- ११), ९.पतीची सेवा हेच पत्नीचे व्रत होय. तिचा यज्ञ होय. त्याच्या आज्ञेत राहाणे हाच तिचा स्वर्ग होय (अध्याय-५. श्लोक-१५५),१०.स्त्रियांनी पहिला पती वारला तरी कधीही दुसरा पती करू नये.(अध्याय-५. श्लोक-१६२),११.पहिली पत्नी वारली तर तिचे दहन करून पतीने दुसरे लग्न करावे. (अध्याय-५.श्लोक-१६८),११.स्त्री धर्माप्रमाणे मन,वाणी,देह,यांच्याद्वारे जी आपल्या पतीची कायम सेवा करते तिलाच स्वर्ग मिळतो. (अध्याय-५.१६६),१२.पिता,पती, आप्त यांनी स्त्रियांस सर्वदा आपल्या आधीन ठेवावे.सामान्य विषयांमध्ये त्या आसक्त झाल्यास त्यास आपल्या वश करून घ्यावे.(अध्याय-६.श्लोक-२), १३. विवाहाच्या पूर्वी पित्याने,त्यानंतर पतीने,म्हातारपणी पुत्राने तिचे रक्षण करावे.सारांश कोणतीही स्त्री स्वातंत्र्यास पात्र नाही.योग्य नाही. (६.श्लोक-३) १४.स्त्रियांना वेदांचा अधिकार नाही.स्मृतींचा नाही.धर्माचा नाही. त्या धर्मज्ञ बनू शकत नाहीत.त्या अशुभ असतात.(अध्याय-९. श्लोक-१८).या नियमाच्या व्यक्तीरिक्त ब्राम्हण,क्षत्रिय व वैश्य या वर्णांना कर्जाच्या व्याजाचा दर वर्णाच्या क्रमांकानुसार ठरलेला होता.जो खालचा वर्णाचा त्याला अधिक होता. म्हणजे शुद्राला कर्जावर सर्वाधिक व्याज दर निश्चित केला होता. इतकेच नव्हे,तर शौचावेळी कुणी कितीवेळा ढुंगण धुवायचे याबाबतही नियम होता.ब्राम्हणाने आठवेळा,क्षत्रियाने सहावेळा,वैश्याने चारवेळा तर शुद्राने दोनवेळा शौच साफ करायचे. अन्याय करणारे, माणसातून उठविणारे,पशु पक्षाही वाईट लेखणारे शुद्रांसाठी इतके जाचक नियम मनुस्मृतीमध्ये असतील तर त्या मनुस्मृतीचे दहन कोणता शुद्र व हिंदू धर्मातील महिला करणार नाही? डॉ.बाबासाहेब आंबेडकर यानी महाड येथे २५ डिसेंबर १९२७ रोजी विधीवत मनुस्मृतीचे दहन केले.तरीही त्या धर्माचे प्रमुखांना पश्चाताप झाला नाही आणि आजही होत नाही.उलट बाबासाहेबांनी मनुस्मृती जाळली म्हणून त्यानी लिहिलेले भारताचे संविधान जाळतात.बाबासाहेबांनी लिहिलेल्या भारतीय संविधनातील एकही आयपीएस व सिव्हील कोड ब्राम्हण,क्षत्रिय,वैश्य,शुद्र असो अथवा हिंदू धर्मातील महिला असो किंवा इतर कोणत्याही धर्मातील व्यक्ती असो त्यांच्यावर अन्याय करणारा नाही. तरीही मनुस्मृतीवादी संविधान जाळत असतील तर त्याना या देशात माणसा-माणसांमध्ये भेद हवे आहेत. वर्ण हवे आहेत आणि वर्ण क्रमवारीनुसार अधिकार हवे आहेत.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मनुस्मृतीचे दहन केले म्हणून देशाच्या ठिकठिकाणी त्या घटनेचा स्मृतिदिन प्रत्येक वर्षाच्या २५ डिसेंबरला साजरा केला जातो. बाबासाहेबांना मानणारे हिंदू धर्मातील हजारोच्या संख्येने महाडमध्ये एकत्र येतात. त्यामध्ये बौध्द धम्मीयही असतात. बौध्दांनी मनुस्मृतीचे दहन करावे का? हा प्रश्न सर्वात महत्वाचा आहे.आजवर यावर कोणी भाष्यच करत नसल्याचे दिसून येईल.हिंदू धर्मात अन्याय अत्याचार आहे म्हणूनच खालच्या जातीच्या लोकांना मोठ्या प्रमाणात धर्मांतर केले आहे. मग कोण मुस्लीम झाले तर कोणी ख्रिस्ती झाले.याबाबतच्या बातम्या बाबासाहेब आंबेडकर यांच्या पाक्षिक ‘मूकनायक’ व पाक्षिक ‘बहिष्कृत भारत’ च्या अनेक अंकामध्ये छापून आलेल्या आहेत.पाक्षिक बहिष्कृत भारतच्या १६ सप्टेंबर १९२७ रोजीच्या बहिष्कृत भारतधील बातमी अशी ‘कामटी, नागपूर येथील शंकर मुकुंद बैले यानी कपाळाला चंदन लावले व जानवे घातले म्हणून हलवायाने जोड्याने मारले. गंध पुसला व जानवे तोडले व सर्व महार व चांभारांच्या नावाने अश्लिल शिव्या दिल्या. त्यामुळे कामटीतील महारवर्ग चिडून जावून मुसलमान होण्यास तयार झाला आहे.’ त्यावरून लक्षात येते की,हिंदू धर्मातील विशेषतः निच जातीतील सरसकट लोक विदेशी मुसलमानांच्या तलवारीच्या टोकावर मुसलमान किंवा इंग्रजांच्या बंदुकीच्या नळीवर ख्रिस्ती झाले नव्हते,तर हिंदू धर्माच्या मनुस्मृती कोडातून होणार्या छळाला कंटाळून व गुलाममुक्त होण्यासाठी त्यानी धर्म बदलला.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यानीही १९५६ ला धर्मांतर करण्यामागचे हिंदू धर्मात आपण गुलाम आहोत हे जाणूनच स्वगृही येण्याचा निर्णय घेवून स्वतःला बौध्द घोषित केले. नागपुरात धम्म दीक्षाचा कार्यक्रम घेतला. आजवर जितकेही मुसलमान झाले,ख्रिस्ती झाले त्यानाही पुन्हा हिंदू धर्मांच्या मनुस्मृतीवर उलट सुलट न बोलता,त्या हिंदू धर्मातील सण-वार साजरे न करता, आपल्या धर्मातील संहिता पाळत गेले.आपल्या धर्मातील सण-वार साजरे करत राहिले. अलिकडचेच म्हणजेच ३५-२५ वर्षापुर्वीचे दोन उदाहरण घेवू. कोल्हापूर जिल्हयाच्या शिरोळ तालुक्यातील अब्दुललाट येथील दिलीप कांबळे हा २५ वर्षापुर्वी मुसलमान झाला. दिलीप नावाऐवजी ‘दिलावर’ आणि कांबळे आडनावाऐवजी ‘खान’ अशा आडनावाने त्याचे नामांतर केले. कोल्हापुरातील बुधवार पेठेतील मुसलमान मुलीवर झालेल्या प्रेमापोटी दिनकर कांबळे याने इस्लाम कबूल केला. त्याचेही दिनमोहम्मद असे नामांतर केले. आजही ते दोघेही कधीच मनुस्मृतीचे नावही तोंडात घेत नाहीत. पाकिस्तानचे निर्माते मोहम्मद अली जीना यांचे पुर्वज मुसलमान नव्हते. त्यांचाही मुस्लीम धर्मापर्यंत प्रवास व्हाया हिंदू मार्गाने झाला. कोणताच धर्म आपल्या लोकांना इतर धर्माची निंदानालस्ती करण्याची व त्या धर्माचे कोणत्याही बाबतीतील अनुकरण करण्याची परवानगी देत नाही. बौध्द धम्मही देत नाही. मग बौध्दांनी मनुस्मृती दहन करावी का? किंवा मनुस्मृती दहन स्मृतिदिन साजरा करावा का? किंवा त्या कार्यक्रमात सहभाग घ्यावा का? हिंदू धर्मातील प्रमुखांचा व १९५६ पुर्वीच्या बौध्दांचा हा प्रश्न आहे.


बाबासाहेबांनी धर्मातर करतेवेळी २२ प्रतिज्ञा दिल्या आहेत.त्या प्रतिज्ञादेखील मनुस्मृती दहन स्मृतिदिन साजरा करणेस मान्यता देत नाही.हिंदू धर्म सोडून बौध्द होणे म्हणजे आपण मनुस्मृतीमुक्त होतो याचे भान असणे महत्वाचे आहे. हिंदू धर्मातील गुलामानी व महिलांनी मनुस्मृतीचे दहन स्मृतिदिन साजरा केला तर हरकत नाही. त्याना त्याची गरज आहे. बाबासाहेबांचे त्यांच्यावर अनंत उपकार आहेत. हिंदू धर्मातील प्रत्येक महिलांनी जोवर त्या हिंदू धर्मात आहेत तोपर्यंत बाबासाहेबांचे उपकार मानले पाहिजेत. कारण या काळात म्हणजचे आजपासून ९५ वर्षापुर्वी मनुस्मृतीची अंमलबजावणी होत होती,त्या काळात बाबासाहेब आंबेडकर मनुस्मृतीचा होम करूनच थांबले नाहीत,तर मनुस्मृतीबर हुकूम स्वतंत्र भारताचे संविधान लिहून त्यामध्ये मनुस्मृतीच्या प्रत्येक आयपीएल व सिव्हील कोडला छेद देणारे कोड करून हिंदू महिलांना व शुद्रांना मानवी हक्क आणि अधिकाराचा न्याय मिळवून दिला. बाबासाहेबांनी लिहिलेल्या संविधान व हिंदू कोड बिलामुळेच हिंदू धर्माची छि-थू थांबली.अन्यथा मनस्मृतीमधील उपरोक्त दिलेले कोड आजही लागू असते, तर त्या धर्माला कोणी चांगले म्हटले असते का? मनुस्मृतीची पुन्हा अंमलबजावणी व्हावी त्याशिवाय ‘गर्व से कहो हम हिंदू है’ म्हणणार्या शुद्र (एससी, एसटी,एनटी, व्हीजेएनटी, ओबीसी व एसबीसी या प्रवर्गात समाविष्ट असणार्या हिंदू धर्मातील जाती) व महिलांना (हिंदू धर्मातील सर्व पंथ व जातीतील महिला) हिंदू धर्मात स्वताची काय लायकी आहे हे समजणार नाही. या शुद्र व महिलांनी उद्या सोमवारी २५ डिसेंबर रोजी ९६ वा मनुस्मृती दहनाचा स्मृतिदिन साजरा करणेस काहीच हरकत नाही.

*********

**देवदास बानकर**
**९२२५८०६९९०**
**कोल्हापूर.**

# हिवाळा सुरू झाल्यावर का वाढतोय कोरोनाचा संसर्ग?

सध्या देशात कोरोनाच्या नव्या व्हेरिएंटने चिंता वाढवली आहे. देशातील एकूण ११ राज्यांमध्ये गछ.१ या कोरोनाच्या नव्या व्हेरिएंटच्या रूग्णांमध्ये वाढ होताना दिसत आहे. हिवाळा सुरू झाल्यावर कोरोनाचा हा नवा व्हेरिएंट झपाट्याने वाढू लागला आहे. त्यामुळे, जगभरात चिंता व्यक्त केली जात आहे. भारतासोबत इतर अनेक देशांमध्ये या नव्या व्हेरिएंटचे रूग्ण वाढत आहेत. आतापर्यंत देशातील ११ राज्यांमध्ये कोरोनाचा नवा व्हेरिएंट आढळून आला असून आरोग्य यंत्रणा हाय अलर्ट झाली आहे. मूळात हिवाळा सुरू झाल्यावर कोरोनाचा संसर्ग का वाढला आहे? हा सर्वात मोठा प्रश्न आहे. यामागची कारणे काय आहेत? ते जाणून घेऊयात.देशात कोरोनाच्या नव्या व्हेरिएंटची प्रकरणे पुन्हा एकदा वाढू लागली आहेत. अशा परिस्थितीमध्ये हिवाळ्यात कोवीड–१९ चे नवे व्हेरिएंट्स का आढळतात ? असा प्रश्न उपस्थित होणे स्वभाविक आहे. कारण, हिवाळ्यातच या कोरोनाचे नवे प्रकार आढळतात आणि याचा संसर्ग देखील हिवाळ्यात वाढताना दिसून येतो.या संदर्भात वैद्यकीय तज्ज्ञ म्हणतात की, हिवाळ्यात श्वसनाचे संक्रमण वाढते. या सिझनमध्ये इनफ्लूएंझा अधिक प्रमाणात वाढते. त्यामुळे, फ्लूची लागण झाली की, सर्दी, खोकला आणि तापाचा त्रास होतो. अशा परिस्थितीमध्ये उपचारांसाठी रूग्ण रूग्णालयात जातात मग त्यांची कोवीड चाचणी केली जाते आणि मग कोवीडची प्रकरणे समोर येतात. या कारणांमुळे हिवाळ्यात कोवीडची रूग्णसंख्या देखील वाढते.या फ्लूचा सर्वाधिक संसर्ग हा लहान मुलांना आणि वयोवृद्ध व्यक्तींना लगेच होतो. कारण, लहान मुलांची आणि वयोवृद्ध व्यक्तींची रोगप्रतिकारकशक्ती ही कमी असते.हिवाळ्यात रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होते हिवाळ्यामध्ये अनेक प्रकारच्या संसर्गांना लोक बळी पडतात. त्यामुळे, लोकांची रोगप्रतिकारक शक्ती



कमकुवत होते. त्यामुळे, संसर्ग होणे हे सामान्य झाले आहे. या दिवसांमध्ये लहान मुले, वयोवृद्ध यांच्यासोबत इतर वयोगटातील व्यक्तींची रोगप्रतिकारक शक्ती ही कमी असते. त्यामुळे, आपण सर्वजण संसर्गाला लगेच बळी पडतो आणि कोरोनाच्या रूग्णसंख्येत वाढ होते.

# हिवाळ्यात अक्रोड खाण्याचे 'हे' आरोग्यदायी फायदे तुम्हाला माहित आहेत का?


ड्रायफ्रूट्स खायला आपल्या सर्वांनाच आवडते. ड्रायफ्रूट्समध्ये अनेक प्रकारचे घटक येतात. त्यामध्ये, बदाम, काजू, अक्रोड, पिस्ता, अंजीर, चारोळ्या, खारीक, खजूर आणि मनुका यांचा समावेश आढळून येतो. ड्रायफ्रूट्सला सुकामेवा असे ही म्हटले जाते. कारण, यातील सर्व घटक हे सुकवलेले असतात. त्यामुळे, त्यात जीवनसत्वे आणि खनिजांचे भरपूर प्रमाण आढळून येते.या सुकामेव्याचे रोज पुरेशा प्रमाणात सेवन केल्याने शरीराला शक्ती तर मिळतेच शिवाय, शरीरातील कमतरता भरून काढली जाते. या सुकामेव्यातील महत्वाचा घटक म्हणजे अक्रोड होय.अक्रोडमध्ये जीवनसत्वे, खनिजे, प्रथिने आणि फायबर्सचे भरपूर प्रमाण आढळून येते. त्यामुळे, अक्रोडचे सेवन करणे हे आपल्या आरोग्यासाठी अतिशय फायदेशीर आहे. हिवाळ्यात अक्रोड खाण्याचे कोणते फायदे आहेत? त्याबद्दल आज आपण जाणून घेणार आहोत.अक्रोडचे



सेवन केल्याने रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित राहण्यास मदत होते. त्यामुळे, मधुमेह आणि टाईप २ मधुमेह असणाऱ्या व्यक्तींनी हिवाळ्यात आवर्जून अक्रोडचे सेवन करावे. शक्यतो सकाळी रिकाम्या पोटी अक्रोडचे सेवन करणे फायदेशीर मानले जाते.हाडांना मिळते बळकटी हिवाळ्यात खास करून हाडांशी संबंधित अनेक समस्या उद्भवण्याची शक्यता असते. जर तुम्हाला या संदर्भातील समस्यांचा सामना करावा लागत असेल तर, रोज सकाळी अक्रोडचे सेवन करा.अक्रोडमध्ये आढळून येणाऱ्या अल्फा–लिनोलेनिक ॲसिडमुळे आपल्या शरीरातील कमकुवत हाडांना बळकटी मिळण्यास मदत होते. जर तुम्हाला हाडांशी संबंधित समस्या असतील आणि मांसपेशींमध्ये वेदना होत असतील तर तुम्ही रोज अक्रोडचे सेवन करण्यास सुरूवात करा. यामुळे, तुमच्या हाडांना आणि दातांना बळकटी मिळेल.वजन कमी करण्यास लाभदायी हिवाळ्यात अक्रोडचे सेवन केल्याने वजन कमी होण्यास मदत होते. अक्रोडमध्ये प्रथिने, फायबर्स, फॅट्स आणि जीवनसत्वांचे मुबलक प्रमाण आढळून येते. ज्यामुळे, अक्रोडचे सेवन केल्यानंतर भूक कमी लागते आणि पोट भरलेले राहते. शिवाय, दिवसभर आपल्या शरीरात ऊर्जा राहते.अक्रोडमध्ये मूळात कॅलरीजचे प्रमाण कमी असते, त्यामुळे, आपले वजन नियंत्रित राहण्यास मदत होते. जर तुम्हाला ही वजन कमी करायचे असेल तर अक्रोडचे सेवन करायला सुरूवात करा.

# तुम्ही देखील गरजेपेक्षा जास्त व्हिटॅमिन डी चे सेवन करताय? यामुळे शरीरावर होणारे हे दुष्परिणाम जाणून घ्या

व्हिटॅमिन डी शरीरासाठी खूप फायदेशीर आहे. शरीरात पोषक तत्वांच्या कमतरतेमुळे अनेक आजारांना सामोरे जावे लागते. रोगांपासून मुक्त राहण्यासाठी शरीरात आवश्यक पोषक तत्वे असणे अत्यंत आवश्यक आहे. आज आम्ही तुम्हाला व्हिटॅमिन डी जास्त प्रमाणात घेतल्यास कोणते दुष्परिणाम होतात ते सांगणार आहोत.पोषक तत्वांचे सेवन केल्याने शरीरातील अनेक प्रकारचे आजार दूर होतात. जर तुम्ही व्हिटॅमिन डीचे जास्त प्रमाणात सेवन केले तर शरीरात अनेक प्रकारचे आजार दिसून येतात. याचे जास्त प्रमाणात सेवन केल्याने उलट्या होतात.जर तुम्ही व्हिटॅमिन डी जास्त प्रमाणात घेत असाल तर तुम्हाला भूकही कमी लागते. तुम्हाला पोट भरल्यासारखे वाटते. तुम्ही खूप जास्त सप्लिमेंट्स किंवा प्रिसक्रिप्शन व्हिटॅमिन डी घेऊ नये.जास्त प्रमाणात व्हिटॅमिन डी घेतल्याने मूत्रपिंडाशी संबंधित समस्या अनेकदा दिसून येतात. तुम्हाला किडनी स्टोनची समस्या होऊ शकते. त्यामुळे किडनी निकामी होण्याची शक्यता जास्त असते.



हाडे निरोगी ठेवण्यासाठी व्हिटॅमिन डी असणे खूप महत्वाचे आहे, परंतु ते जास्त प्रमाणात घेतल्याने हाडे खूप कमकुवत होऊ शकतात.शरीरात व्हिटॅमिन डीचे प्रमाण अधिक असल्याने तहान अधिक लागते आणि मानवांमध्ये डिहायड्रेशनचा धोका वाढू लागतो.

# सोन्याच्या साखळ्या चोरणाऱ्या आरोपीला बीड मधून अटक. स्थानिक गुन्हे शाखे ची कारवाई

लातूर :– गर्दीचा फायदा घेऊन गळ्यातील सोन्याच्या साखळ्या/ लॉकेट चोरणाऱ्या सराईत आरोपीला बीड मधून अटक. ३३ ग्राम वजनाचा २ लाख रुपये किमतीचा लॉकेट जप्त. पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी. याबाबत थोडक्यात माहिती अशी की, पोलीस अधीक्षक श्री.सोमय मुंडे यांनी लातूर जिल्ह्यामध्ये घडणाऱ्या चोरी व चैन स्नॅचिंग चे गुन्हे उघडकीस आणण्याकरिता आदेशित केले होते. त्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक सोमय मुंडे,अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात पोलीस अधिकारी/अमलदारांचे पथक तयार करण्यात आले होते. सदर पथकामार्फत जिल्ह्यातील विविध गुन्हेगारांची माहिती एकत्र करून त्याचे विश्लेषण करण्यात येत होते. तसेच गोपनीय बातमीदार नेमून त्यांच्याकडून माहिती घेण्यात येत होती.

पोलीस ठाणे मुरुड येथे श्री.मनोज जरांगे यांचे सभेमध्ये गर्दीचा फायदा घेऊन गळ्यातील लॉकेट चोरीची घटना घडली होती त्यावरून पोलीस ठाणे मुरुड येथे चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्याचा समांतर तपास करीत असताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीवरून चोरलेले सोन्याचे लॉकेटसह आरोपीला तेलगाव चौक, बीड परिसरातून ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडे सविस्तर विचारपूस केली असता त्यांनी त्यांचे नाव

उमेश सत्यवान टल्ले, वय ३३ वर्ष राहणार नूर कॉलनी, बीड. असे असल्याचे सांगितले. नमूद आरोपीला ताब्यात घेऊन सखोल विचारपूस केली असता त्याने सांगितले की, त्याने मुरुड येथील श्री मनोज जरांगे यांचे सभेमधील एकाच्या गळ्यातून गर्दीचा




फायदा घेऊन, चोरल्याचे कबूल केले.

नमूद आरोपीने वर गुन्ह्यात चोरलेला सोन्याचे ३३ ग्रॅम वजनाचा २ लाख रुपये किमतीचा सोन्याचा लॉकेट जप्त करण्यात आला आहे.

सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले, यांच्या नेतृत्वात सहाय्यक पोलीस निरीक्षक व्यंकटेश आलेवार, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक संजू भोसले,पोलीस अमलदार रियाज सौदागर, योगेश गायकवाड, रामहरी भोसले, प्रदीप स्वामी, यांनी केली आहे.

# फळे खाण्याची योग्य वेळ कोणती? चुकीच्या वेळी खाल्ल्यास काय होईल? जाणून घ्या

तंदुरुस्त राहण्यासाठी आणि आजारांपासून दूर राहण्यासाठी फळे खाणे खूप आरोग्यदायी आहे. आपण कधीही फळे खाऊ शकतो, पण तुम्हाला माहित आहे का की एक वेळ अशी असते जेव्हा फळे खाणे जास्त फायदेशीर असते.मधुमेह, रक्तदाब, लठ्ठपणा यांसारख्या आजारांनी जवळजवळ प्रत्येकजण हैराण आहे. या आजारांपासून आराम मिळवण्यासाठी फळांचा आहारात समावेश करणे आवश्यक आहे.फळे खाल्ल्याने पचनक्रिया योग्य राहते. दिवसाची सुरुवात निरोगी करायची असेल तर फळांनी करा, असे डॉक्टर अनेकदा सांगतात. यामुळे तुम्ही दिवसभर उत्साही राहाल. अशा परिस्थितीत रिकाम्या पोटी कोणती फळे खाऊ शकतात असा प्रश्न पडतो. आज आम्ही तुम्हाला फळे खाण्याची योग्य वेळ आणि पद्धत याबद्दल सांगणार आहोत.अशी काही फळे आहेत जी तुम्ही रिकाम्या पोटी सहज खाऊ शकता. परंतु अशी अनेक फळे आहेत जी तुम्ही



ब्रेकफास्ट किंवा दुपारच्या जेवणादरम्यान म्हणजेच १० ते १२ च्या दरम्यान खाऊ शकता. हे आरोग्यासाठी खूप चांगले आहे. अशी अनेक फळे आहेत ज्यामध्ये फायबर आणि प्रोटीनचे प्रमाण जास्त असते. ते सकाळी लवकर खाण्याऐवजी दुपारी १०–१२ वाजेपूर्वी खावे.रिकाम्या पोटी हे फळं खाऊ शकता किवी किवीमध्ये भरपूर पोषक असतात जे तुम्ही रिकाम्या पोटी खाऊ शकता. डेंग्यूच्या आजारात किवी खूप चांगली आहे. यामुळे पचनक्रिया बरोबर राहते आणि शरीराला भरपूर ऊर्जाही मिळते.सफरचंद रिकाम्या पोटी तुम्ही सफरचंद आरामात खाऊ शकता. यामुळे तुमचे वजन नियंत्रणात राहण्यासोबतच शरीरात पोषक तत्वांची कमतरता भासणार नाही. बद्धकोष्ठता आणि गॅसपासून मुक्ती मिळेल. पचनसंस्था चांगली राहील.डाळिंब डाळिंबात भरपूर प्रमाणात अँटीऑक्सिडंट्स आणि अँटी–इंफ्लेमेटरी असतात. तुम्ही रिकाम्या पोटी आरामात डाळिंब खाऊ शकता. डाळिंब खाल्ल्याने शरीरात लोहाची कमतरता होत नाही. आणि रोगप्रतिकारक शक्ती देखील चांगली असते.पपई पपई खाल्ल्याने शरीराला अनेक फायदे होतात. वजन नियंत्रणात ठेवायचे असेल तर पपई सर्वोत्तम आहे. तसेच कोलेस्ट्रॉल नियंत्रणात राहते. बद्धकोष्ठता आणि पोटफुगीच्या समस्येपासूनही आराम मिळतो.

# पारदर्शक चौकशीची वनसंरक्षक धुमाळ यांना एलर्जी.?

किनवट/शेख शौकत :– वनबल प्रमुखांच्या आदेशाला केराची टोपली.! किनवट : ठोस आणि सबळ पुरावे सादर करा नाहीं तर चौकशी बंद करू असे नेहमीचं म्हणणाऱ्या उप वनसंरक्षक यांना ठोस आणि सबळ पुरावे सादर केलेले असतांनाही चौकशी टाळली जाते म्हणजे या अवैध वृक्ष तोडीस त्यांचे खुले पाठबळ तर नाहीं ना अशी शंका स्पष्ट दिसतं आहे. किनवट आणि बोधडी मधील राखीव जंगलात सागवान झाडांची होणारी अवैध वृक्ष तोड थांबवण्यासाठी आणि वृक्ष तोडीस सहकार्य करणारे अधिकारी यांचा वर निलंबनाची कारवाई करावी या मागणीसाठी हिवाळी अधिवेशनात विधानभवन परिसरात आमरण उपोषण आणि मुख्यमंत्री यांचे दालनात आत्मदहन आंदोलनाचा पवित्रा घेतलेल्या सामाजिक कार्यकर्ते प्रशांत वाठोरे यांना पोलीस अधीक्षक कार्यालय नागपूर यांचे आदेशाने सदर बाजार पोलीस निरीक्षक आणि त्यांचे सहकारी यांनी मा.प्रधान मुख्य वनसंरक्षक श्री. टेंभुर्णीकर साहेब (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य कार्यालय नागपूर यांची भेट घालून दिली होती.त्यावेळी झालेल्या चर्चे नुसार त्यांचे आदेशाने मा.डॉ.प्रवीण चव्हाण अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक साहेब (संरक्षण) नागपूर यांनी किनवट आणि बोधडी वनपरिक्षेत्र कार्यालय मधे झालेल्या सागवान झाडांचा अवैध वृक्ष तोड प्रकरणी छत्रपती संभाजीनगर कार्यालयाचे वनसंरक्षक धुमाळ साहेब यांना दक्षता पथक मार्फत विभागीय समिती गठित करून चौकशी करण्याचे आदेशित केले असतानाही वनसंरक्षक नांदेड वाबळे यांनी पाठवलेल्या खोट्या आणि दिशाभूल करणारा अहवाल ग्राह्य धरत तक्रारधारक यांनी मागणी केलेल्या पारदर्शक चौकशीला बगल दिली असून वनसंरक्षकांनी सरळ सरळ वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशास केराचीच टोपली दाखवली आहे. सदरील प्रकरणी न्याय मिळत नसल्याने सामाजिक कार्यकर्ते यांनी दिनांक २६ डिसेंबर २०२३ पासून वनसंरक्षक कार्यालय छत्रपती संभाजीनगर कार्यालय समोर लोकशाही मार्गाने आमरण उपोषणाला सुरुवात करत असल्या बाबत पत्र ई मैल द्वारे पाठवले आहे.







मराठवाड्यातील एकमेव जंगल असलेल्या किनवट तालुक्याला मौल्यवान आणि टिकावू अश्या सागवान लाकडाच्या जंगलाने व्यापलेले आहे.एकीकडे शासन २ कोटी,३३ कोटी,५० कोटी वृक्ष लागवड अश्या विविध प्रकारच्या योजना आखून झाडे लागवड करताना दिसत आहे.तर दुसरीकडे ज्यांचावर येथील पूर्णत वाढ झालेल्या राखीव जंगलाच्या रक्षणाची जबाबदारी दिलेली आहे अश्या वन विभागातील कर्मचाऱ्यांत राखीव जंगल नष्ट कसे होईल हे बघण्यात चढाओढ लागलेली दिसतं आहे. किनवट आणि बोधडी या दोन्ही वनपरिक्षेत्र प्रादेशिक कार्यालय अंतर्गत असलेल्या राखीव जंगलातील अवैध वृक्षतोडीचे प्रकरण ठोस आणि सबळ पुराव्यासह मा.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक साहेब,(संरक्षण) महाराष्ट्र राज्य नागपूर यांच्याकडे सामाजिक कार्यकर्ते प्रशांत वाठोरे यांनी सादर केले होते.ज्याला चौकशी कामी मा.मुख्य वनसंरक्षक औरंगाबाद यांचे कडे तर त्यांनी ते उप वनसंरक्षक नांदेड येथील मा.वाबळे साहेबांकडे वर्ग करण्यात आलेले होते.ते त्यांनी सहायक वनसंरक्षक नांदेड यांचे कडे चौकशी कामी दिले होते. अशी ही टोलवाटोलवी होत आहे परंतु ठोस आणि सबळ अशी कोणतीही कार्यवाही अवैध वृक्ष तोड थांबवण्यासाठी होताना दिसत नाही आहे. चौकशी साठी ठोस आणि सबळ पुरावे सादर करा नाहीतर चौकशी बंद करू असे पत्रव्यवहार करत चौकशीसाठी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले गेलेले आजपर्यंत घडलेले आहे. तत्कालीन चौकशी अधिकारी लखमावाड सहायक वनसंरक्षक नांदेड यांना प्रत्यक्ष भेटून ठोस आणि सबळ पुरावे सादर केलेले असतांनाही वनसंरक्षक यांनी पुरावेच सादर केलेले नसल्याने तक्रार नस्ती बंद करण्याचे कळविले आहे. मुळात तक्रार धारक यांना न बोलावता चौकशी पूर्ण होवूच शकत नाही तक्रार धारक दाखवेल तिथे चौकशी प्रत्यक्ष जायमोक्यावर जावून पूर्ण होईल परंतु वनसंरक्षक धुमाळ साहेबांचा पत्रावरून असेच दिसतं आहे की त्यांना पारदर्शक चौकशी नको आहे.एकंदर परिस्थिती बघता पारदर्शक चौकशीची त्यांस एलर्जी झालेली दिसत आहे.

# राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे नवे प्रदेशाध्यक्ष,जिल्हा निरीक्षक जाहीर

लातूर,दि.२५ःराष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक अध्यक्ष बबनराव घोलप आणि वरिष्ठ राष्ट्रीय सल्लागार पंढरीनाथ पवार यांनी विद्यमान कार्यकारिणी रद्द करुन, महासंघाचा विस्तार करण्यासाठी,राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे महाराष्ट्रातील नवे प्रदेशाध्यक्ष म्हणून माधव गायकवाड (पूर्व पश्चिम विदर्भ व मराठवाडा) आणि डॉ.शांताराम कारंडे (कोकण,पश्मिम महाराष्ट्र व उत्तर महाराष्ट्र) या दोघांची तसेच राज्यातील ३४ जिल्ह्याचे निरीक्षक जाहीर केले आहेत,त्यांच्यावर जिल्ह्याची कार्यकारिणी निवडण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

जिल्हानिहाय निरीक्षक याप्रमाणे आहेतः १) मुंबई:भानुदास विसावे,२)ठाण :राजेश चांगदेव खाडे,३)पालघरःबाळकृष्ण कांबळे४) रायगड :उमाकांत डोईफोडे५)रत्नागिरी:गौतम बळवंते६) पुणे:दत्तात्रेय गोतीसे,७)सातारा :ज्ञानेश्वर कांबळे८) सोलापूर : शशिकांत सोनावणे९) सांगली:जगन्नाथ वाघमारे१०) कोल्हापूर : पी. डी.चव्हाण११)संभाजी नगर: भाऊ साहेब कांबळे१२) नाशिक:सुदाम अण्णालोखंडे३) जळगाव:गजानन भटकर१४) धुळे:दिलीपकानडे१५) नंदुरबार:पांडुरंग बाविस्कर१६)यवतमाळ: ज्ञानदेव इंगळे१७)अमरावती:रामा उंबरकर१८)बुलढाणा:भरत भरतूने१९)अकोला:प्रा.डी.आर.माळी२०)वाशिम :डॉ. गणेशबोरकर,२१)बीड :संजय बाबा शिंदे२२)नांदेड: संभा वाघमारे२३) जालना : ज्ञानेश्वर काटकर२४) धाराशिव : सी. के. मुरळीकर२५) लातूर : डॉ. गोपाळ बच्छिरे२६) परभणी : रोहिदास बनसोडे२७)हिंगोली: माधव मारुती गायकवाड,२८) गडचिरोली : ज्ञानेश्वर बसेशंकर,२९ चंद्रपूर : लीलाधर कानोडे३०) नागपूर:रवींद्र राजुस्कर३१)वर्धा :ज्ञानेश्वर काकडे३२) गोंदिया : महादेव झिंझाडे३३) भंडारा : फुलचंद मालाधारी ३४) अहमद नगर:आनंद गवळी

# उल्हासनगर येथे अंध हितकारी संघाच्या वतीने ३०६ वा दिव्यांग विवाह सोहळा उत्साहात संपन्न



उल्हासनगर / प्रतिनिधी : उल्हासनगर मध्ये अंध हितकारी संघाच्या वतीने दिव्यांगासाठी अनेक उपक्रम राबन्यात येत आहेत. यामध्ये दुव्यांगाना सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यापासुन ते त्यांचे विवाह लावन्या पर्यंत हा संघ कार्यरत आहेत. या संघामध्ये नेरळ ते दिव्यापासुन अंध व दिव्यांग महिला पुरुष जुळलेले आहेत. या अंधाना मायेची सावली देणारे जगदिश पटेल व सुशिला पटेल हे दापंत्य उत्कृष्ट काम करत आहे. या दापंत्याने आता पर्यंत ३०५ दिव्यांगाचे विवाह लावुन दिले असुन त्यांना संसारोपयोगी साहित्य उपलब्ध करुन दिले आहे. काल ३०६ व्या दिव्यांगाचा लग्न सोहळा कँप ४ येथील सिध्दार्थ बुध्द विहारात संपन्न झाला आहे.

उल्हासनगर येथे अंध हितकारी संघाचे जगदिश पटेल व सुशिला पटेल हे दापंत्य या संघाच्या माध्यमातुन अंध , दिव्यांग व बेसहारा व्यक्तींचे आधारस्तंभ असुन त्यांच्या या संघात नेरळ ते दिव्या पासुन चे महिला पुरुष जुळलेले आहेत. या दिव्यांगाना जेवनापासुन कपडालत्ता देण्यापासुन ते त्यांचे विवाह लावण्याचे कार्य पटेल दापंत्य करत आहे . यांनी आता पर्यंत ३०५ दिव्यांगाचे लग्न लावुन त्यांचा पुर्ण संसार उभा करुन दिला आहे. असाच काल एक विवाह सोहळा संपन्न झाला असुन ३०६ वा हा लग्न सोहळा होता . तथागत भगवान गौतम बुद्ध व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आशीर्वादाने दिव्यांग कन्या जया मोडले यांचा अनिल यांच्या सोबत विवाह सोहळा २४ डिसेंबर रोजी सिध्दार्थ बुध्द विहारात संपन्न झाला. दरम्यान इतर सामाजिक संस्थांच्या सहभागातून मुलीला योग्य सन्मानाने घरगुती वस्तू देऊन कन्यादान करण्याची संधी मिळाली . या विवाह सोहळ्याला उल्हासनगर येथील सामाजिक कार्यकर्ते ढालु नाथानी, पत्रकार रामेश्वर गवई , शशिकांत दायमा , मीरा सपकाळे , भानू पाल, मंजू सजनानी कुटुंबीय, लेप्रसी कॉलनीतील मोहनजी उपस्थित होते.

# उल्हासनगर महापालिकेचा २०२३ मधील अध्यादेश करते नागरिकांची फसवणुक

उल्हासनगर / प्रतिनिधी : महाराष्ट्र शासनाच्या वतीने शहरातील अवैध बांधकामांना नियमित करण्या साठी काढण्यात आलेल्या १७ फेब्रुवारी २०२३ च्या नवीन सुधारित अध्यादेशात जमिनीचा भोगवटा दर निश्चित केला नसल्याने ठाणे जिल्हाधिकारी आणि उल्हासनगर महापालिका प्रशासन संभ्रमात पडले असून हा १७ फेब्रुवारी २०२३ चा नवीन अध्यादेश नागरिकांची फसवणूक करण्या साठी काढण्यात आला आहे का? असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत . उल्हासनगर मधील अनधिकृत बांधकामाना नियमित करण्याची प्रक्रिया २००५ साली सुरु करण्यात आली असून या मध्ये अनधिकृत बांधकामाना २००५ व २००६ च्या वार्षिक मूल्यदर तक्तानुसार (एएसआर ) दंडात्मक शुल्क आकारायचे होते. म्हणुन त्यानुसार महापालिके कडे नागरिकांचे जे अर्ज प्राप्त झाले होते, त्यांच्या वर एएसआर प्रमाणे शुल्क आकरण्यात आले व शासकीय जमिनी चे भोगवटा शुल्क त्याच वर्षाचे वार्षिक शुल्क आकरण्यात येत होते. त्या वेळी नागरिकांनी २००६ च्या अध्यादेशाचे स्वागत केले. त्यावेळी शंभर पेक्षा अधिक अवैध बांधकाम नियमितीकरणा साठी प्राप्त अर्जा वर कारवाई करताना महापालिके ने त्यांच्या कडून बांधकाम नियमितीकरणा चे शुल्क आणि शासकीय जमिनी चा भोगवटा शुल्क घेऊन बेकायदा बांधकामे नियमित केले होते. या प्रकरणी जमिनी च्या संदर्भातील फाईली ठाणे जिल्हाधिकारी यांच्या कडे पाठवण्यात आल्या होत्या त्या वेळी जिल्हाधिकारी यांनी मोजक्या फाईली मंजूर केल्या नंतर काही तांत्रिक कारणे पुढे करून हजारो फाईली परत पाठवल्या गेल्या होत्या. तेव्हा पासून २०२३ पर्यंत कुणाचे ही बांधकामे नियमित झालेले नाही या मुळे उल्हासनगर च्या नागरिकांच्या नैराश्य हाती लागली आहे. दरम्यान शासनाने धोकादायक इमारतींचा प्रश्न मार्गी लावण्या साठी पुन्हा १७ फेब्रुवारी २०२३ चा नवीन सुधारित अध्यादेश काढला आणि त्यात अनधिकृत बांधकामे नियमित करण्या साठी २२०० रुपये प्रति चौ. मी. शुल्क आकारण्याचे निश्चित करण्यात आले, मात्र या अध्यादेशात शासकीय जमिनीचा भोगवटा शुल्क निश्चित करण्यात आले नसल्याने जमिनीचे भोगवटा शुल्क निश्चित करण्या साठी ठाणे जिल्हाधिकारी यांच्या कडे ही प्रकरणे पाठवण्यात आले. परंतु जमिनी चा भोगवटा दर कसे निश्चित करायचे व दंडात्मक दर किती आणि कसे लावायचे, आरक्षित भूखंडा वर असलेले बांधकाम त्यावर धोरण कसे ठरवयचे याचा तालमेळ २०२३ च्या अध्यादेशात बसत नसल्याने जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी संभ्रमात पडले असून या अध्यादेशात अनेक त्रुटी असल्याने अवैध बांधकामे नियमितीकरण करताना उल्हासनगर वासियांना नैराश्याला समोर जावे लागत आहे. २०२३ चा अध्यादेश जाणुन बुजून उल्हासनगर वासियांची फसवणूक करण्या साठी काढला आहे का? असा सवाल उपस्थित करण्यात येत आहे . मात्र या प्रकरणी उल्हासनगर चे आमदार कुमार आयलानी आमदार डॉ बालाजी किणीकर समवेत कोणताही पक्षाचा नेता या बाबत अजिबात चर्चा करीत नाही . किंवा ही गंभीर बाब शासनाच्या निदर्शनात आणुन देत नसल्याचा आरोप करण्यात येत आहे . या प्रकरणी व्यापारी महा पंचायत चे अध्यक्ष गोपी वाधवानी यांनी सांगितले की २०२३ च्या अध्यादेशात जमिनीचा भोगवटा शुल्क निर्धारित करण्यात आला नसल्याने धोकादायक इमारतींचा प्रश्न कधी ही न सुटणारा आहे . या प्रकरणी खासदार श्रीकांत शिंदे यांनी लक्ष घालून हा प्रश्न मार्गी लावायला पाहिजे .

# ग्रंथांकडे दुर्लक्ष ही मोठी मानवी घोडचूक:डॉ.नागेराव कुंभार

लातूर,दि.२५:ग्रंथामुळे अनेक विचारवंत,मोठे महापुरुष घडले.म.फुलेंनी एका विद्येने बहुजन समाजाची मोठी अधोगती झाली असे सांगितले. अनेक पाश्चात्य विचारवंतांनीही ग्रंथांचे महत्व अधोरेखित केले आहे,आणि आपले संविधान निर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी तर ग्रंथासाठी मुंबईत राजगृहाची विचारपूर्वक उभारणी केली,असे सांगून वाचाल तर वाचाल,वाचनामुळे माणसामध्ये उच्च नीतीमत्ता,समानता,सकारात्मकता येवू शकते,म्हणून ज्ञानाची कितीही आधुनिक साधने आली तरी ग्रंथाकडे दुर्लक्ष करणे ही मोठी मानवी घोडचूक ठरेल,तसे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ.नागोराव कुंभार यांनी केले. माळकोंडजी (ता.औसा) येथील गोपाळबुवा सार्वजनिक ग्रंथालयात रविवार,दि.२४ डिसेंबर रोजी दिवाळी अंक प्रकाशन,राज्यशासनाचा ग्रंथमित्र पुरस्कार विजेते दशरथ क्षीरसागर,ज्येष्ठ कथाकार जी.जी.कांबळे यांच्या दुरडी कादंबरीला मिळालेला पुरस्कार,दहावी-बारावीतील गुणवंत विद्यार्थी आणि या गावातील सेवेत रुजू झालेल्या सत्कार समारंभारत अध्यक्षपदावरुन डॉ.कुंभार बोलत होते. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून लातूर विभागीय माहिती उपसंचालक डॉ.शाम टर्के,साहित्यिक विजय चव्हाण यांची उपस्थिती होती.मंचावर ग्रंथालयाचे अध्यक्ष प्रकाश मिरगे,मारुती बरडे,सचिव ग्रंथमित्र पांडुरंग अडसुळे यांची उपस्थिती होती.

माळकोंडजीसारख्या आडवळणाच्या गावात पांडुरंग अडसुळे यांनी दर्जेदार,भरपूर ग्रंथ संपदेसोबतच स्पर्धा परीक्षार्थींची सोय करुन,गावाला वैचारिक परिपक्वता मिळवून दिली आहे,त्यासाठी ते अनेकविध उपक्रम राबवत असतात.देशात केवळ महाराष्ट्रातच विविध विषयांवर प्रकाश टाकणार्या,वैचारिक घुसळण करणार्या,समाजाला दिशादर्शन करण्याचे काम अनेक वर्षांपासून करणार्या दिवाळी अंकाची समृध्द परंपरा चालते आहे. त्यातून अनेक साहित्यिक,कलाकार,आणि सुसंस्कृत राजकारणी घडण्यास मदत झाली. विद्यार्थ्यांनी अभिजात साहित्याचे वाचन करावे,संकटकाळात ते तरुन जाण्यासाठी पूरक ठरतात,जगातल्या अनेक यशस्वी पुरुषांच्या मागे ग्रंथ असल्याचे दिसून येते.ग्रंथ हे माणसाचे अख्खे जीवनच बदलू शकते याची अनेक उदाहरणे देवून,माणसं घडविणारी ग्रंथालय चळवळ समृध्द,सबळ होणे आवश्यक असल्याचे मतही डॉ.नागोराव कुंभार यांनी व्यक्त केले.




डॉ.शाम टर्के यांनी ग्रंथांमध्ये माणसात अमुलाग्र बदल घडविण्याची ताकद आहे. ग्रंथांच्या सान्निध्य-सहवासाने जीवनाला चांगला आकार येतो.वाचनाची सवय असलीच पाहिहजे,ग्रंथाची साथ करणारा जीवनात यशस्वी झाल्याशिवाय राहात नाही,असे सांगून,लोकराज्य मासिक,व इतर दोन ग्रंथ वाचनालयास भेट देवून हे एक समृध्द ग्रंथालय असल्याचा अभिप्राय व्यक्त केला.

कथाकार,जी.जी.कांबळे, ग्रंथमित्र दशरथ क्षीरसागर,विजय चव्हाण आणि साहित्यिक अनिल कदम यांनीही मनोगते व्यक्त केली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथालयाचे सचिव ग्रंथमित्र पांडुरंग अडसुळे यांनी केले. अध्यक्ष प्रकाश मिरगे यांनी आभार मानले.बाळ होळीकर यांनी सूत्रसंचालन केले. प्रारंभी डॉ.एस.आर.रंगनाथ्न यांच्या प्रतिमेचे पूजन करुन,मान्यवर,सत्कारमूर्तींचा भारतीय संविधान,गमजा,तर गुणवंतांना झ्किरा कादंबरी देवून स्वागत करण्यात आले.या कार्यक्रमासाठी ग्रंथपाल शिवलिंग अडसुळे,लिपीक राम अडसुळे,ग्रंथमित्र आत्माराम कांबळे,राहूल लोंढे, ज्ञानेश्वर अडसुळे,आनंद अडसुळे,पल्लवी अडसुळे,पुष्कर मोरे,सिंधू हजारे,मुदगडे,हजारे,गिरीधर जंगाले,अनिलकुमार कांबळे आदिंनी सहकार्य केले.

कृपया सोबतची बातमी प्रसिध्द करावी,ग्रंथमित्र पांडुरंग अडसुळे

## भारतीय धम्म महासंघ, बीड द्वारा ३२ वा रविवार बुद्ध वंदना व मंगल मैत्री प्रार्थना कार्यक्रम संपन्न.

बीड/ प्रतिनिधी: - भारतीय धम्म महासंघ बीड द्वारा ३२ वा रविवार दि. २४.१२.२०२३ रोजी बुद्ध वंदना, २२ प्रतिज्ञा व भारतीय संविधान उद्देशिका वाचन कार्यक्रम आयु सुधाकर बाबुराव जाधव, सामाजिक कार्यकर्ते सह्याद्री ग्यारेजच्या पाठीमागे धानोरा रोड बीड येथील निवासस्थानी अत्यंत मंगलमय वातावरणात घेण्यात आला. सदरील कार्यक्रमात सामुहिक बूध्द वंदना, २२ प्रतिज्ञा व भारतीय संविधान उद्देशिका वाचन घेण्यांत आले. तत्पूर्वी आयु सुधाकर बाबुराव जाधव आणि आयुष्यमती भाग्यश्री सुधाकर जाधव यांनी अगरबत्ती मोमबत्ती प्रज्वलित करून तथागत गौतम बुद्ध व सम्राट अशोक, डॉ बाबासाहेब आंबेडकर, यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पूजन केले. आयु त्रिशला मनोहर राऊत, भारतीय बौद्ध महासभा केंद्रीय शिक्षीका यांनी सामुहिक बूध्द वंदना घेतली. त्यानंतर त्यांनी उपस्थित उपासक व उपासिका यांना समयोचित सखोल मार्गदर्शन केले. प्रस्तुत कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, २२ प्रतिज्ञा वाचन आयु अडव्होकेट चंद्रवदन जाधव, संविधान उद्देशिका वाचन आयु भिवाजी महप्पा जोगदंड यांनी केले. प्रस्तुत कार्यक्रमात बी आर गायकवाड, यांनी समयोचित मनोगत व्यक्त केले. उपस्थित सर्व उपासक उपासिका यांचे आभार सुधाकर जाधव यांनी मानले. कार्यक्रमाचे शेवटी शरणत्तय होवून कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमात आयु एस एम जोगदंड, आनिता शिवाजी जोगदंड, सुनिता भिवाजी जोगदंड, डी एस आठवले, भाग्यश्री सुधाकर जाधव, विवेक जाधव, तेजस जाधव, मनोहर रामभाऊ राऊत यांनी सहभाग नोंदवला.




## अटल बिहारी वाजपेयी राजकारणातले आदर्श व्यक्तिमत्व डॉ. घन:श्याम ताडेवार



लातूर / प्रतिनिधी :- भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी राजकारणातले आदर्श व्यक्तिमत्व होते असे प्रतिपादन महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील हिंदी विभागाचे डॉ. घन:श्याम ताडेवार यांनी केले. महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर जयंती महोत्सव समिती आणि हिंदी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई हे होते तर उपप्राचार्य प्रा. संजय पवार, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, जयंती उत्सव समिती समन्वयक प्रा. डी. आर. भुरे, डॉ. यशवंत वळवी, डॉ. जितेंद्र देशमुख, कार्यालयीन प्रमुख नामदेव बेंदरगे, विनायक लोमटे, गोपाळ तिरमले, शुभम बिराजदार व संयम गवई यांची उपस्थिती होती. यावेळी सर्वप्रथम प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी अटल बिहारी बाजपेयी यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन केले यावेळी कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे यांनी भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांच्या कार्याची ओळख सर्वांना करून दिली. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, महान पुरुषांच्या आशीर्वादाने देशातली पुढची पिढी घडत असते म्हणून अशा थोर पुरुषांचे विचार समाजात रुजले पाहिजेत. यासाठी शासनाने चालवलेला हा उपक्रम अत्यंत स्तुत्य असून त्यानिमित्ताने अनेक थोर महात्म्यांची ओळख समाजाला होते असेही ते म्हणाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डी. आर. भुरे यांनी केले तर आभार उपप्राचार्य प्रा. संजय पवार यांनी मानले.

# स्वातंत्र्य सेनानी स्व. मुर्गाप्पा खुमसे यांना रेणापूर येथे सर्वपक्षीय श्रद्धांजली अर्पण

रेणापूर दि-२५ :- हैदराबाद मुक्ती संग्राम लढ्यातील अग्रगण्य लढवय्ये स्वातंत्र्य सेनानी व पत्रकार स्व. मुर्गाप्पा खुमसे यांना रविवार रोजी सर्वपक्षीय श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. तरुणपिढीला प्रेरणा मिळावी यासाठी मुर्गाप्पा खुमसे यांचे उचित स्मारक रेणापूरात व्हावे अशी अपेक्षा अनेकांनी व्यक्त केली.

राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि स्वामी रामानंद तीर्थ यांचे अनुयायी म्हणून आयुष्यभर संघर्ष करणारे रेणापूर येथील भूमिपुत्र तथा ज्येष्ठ पत्रकार स्वातंत्र्य सेनानी मुर्गाप्पा खुमसे यांचे २१ डिसेंबर २०२३ रोजी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले त्यांच्या कार्याला उजाळा देण्यासाठी व सर्वांच्या वतीने आदरांजली अर्पण करण्यासाठी रविवार दिनांक २४ डिसेंबर रोजी रेणापूर येथील श्री रेणुका देवी मंदिर परिसरात सर्वपक्षीय श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले होते.

प्रारंभी संयोजक चंद्रकांत कातळे यांनी प्रास्ताविक केले. स्वातंत्र्य सेनानी मुर्गाप्पा खूमसे यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केले. यावेळी झालेल्या श्रद्धांजली सभेत सत्यशोधक चळवळीचे के ई हरिदास, राष्ट्रपती आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त अरविंद फुलारी, माजी सरपंच मलिकार्जुन हलकुडे, रेणापूरचे पहिले नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, लातूरच्या माजी महापौर सौ स्मिता खुमसे, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष अँड. प्रमोद जाधव, भाजपाचे तालुकाध्यक्ष अँड. दशरथ सरवदे, शेतकरी आंदोलनाचे नेते सचिन दाणे, शिवसेनेचे रवी चव्हाण, रेणुका शिक्षण संस्थेचे अध्यक्ष देविदास कुटवाड, रेणापूर सोसायटीचे चेअरमन देविदास कातळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे बालाजी कदम व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष उमेश सोमानी प्रा किशन कुडके माजी प्राचार्य वसंत रायमुळे यांच्यासह अनेकांनी आपले मनोगत व्यक्त करून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.



याप्रसंगी आयोजित श्रद्धांजली सभेत बोलताना अनेकांनी त्यांच्या कार्याला उजाळा देत सहवासातील आठवणी सांगितल्या. तरुण पिढीला त्यांच्या कार्याचे स्मरण व्हावे कार्य अजरामर राहावे स्फूर्ती मिळावी यासाठी रेणापूर येथे मुर्गाप्पा खुमसे यांचे स्मारक उभारले पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली.

मिळालेले स्वातंत्र्य आपकमई नसून बाप कमाई आहे त्याची जाणीव जुन्या पिढीला आहे, मिळालेले स्वातंत्र्य टिकवायचे असेल तर स्वातंत्र्य सैनिकांचे स्मारक झाले पाहिजे. रेणापूर तालुका स्वातंत्र्य चळवळीचे आणि सामाजिक समतेचे केंद्र व्हावे सामान्य माणसाच्या प्रश्नासाठी अन्याय अत्याचार विरोधात लढण्याची शिकवण देणाऱ्या मुर्गाप्पा खुमसे यांचे कार्य आणि त्यांचा विचार महासागर असून तो कायम ठेवत राहिला पाहिजे अशी अपेक्षा अनेकांनी बोलताना व्यक्त केली.

सभेचे सूत्रसंचालन अमृतेश्वर स्वामी यांनी केले या श्रद्धांजली सभेस मुर्गाप्पा खुमसे यांच्या परिवारातील सदस्य वसंत करमुडे, रमाकांत वाघमारे, गुरुशिदआप्पा उटगे, अच्युत कातळे, बाबुराव जाधव, लिमनआप्पा पनूरे, सूर्यकांत मोटेगावकर, दत्ता सरवदे, रुपेश चक्रे, शेख अजीम, रखमाजी जोगदंड, रफिक शिकलकर प्रदीप मिरजकर, किशोर चक्रे, विठ्ठल कटके, उत्तम राठोड, सिद्धार्थ चव्हाण, संतोष राठोड, भानुदास कुडके, नागनाथ दळवी, शेख संमशोद्दीन, किशोर चक्रे, शिवाजी भावे, सचिन शिरसकर रेणापूर आणि परिसरातील शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, व्यापारी, विविध संघटनेचे पदाधिकारी व सर्वसाधारण नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE